"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 02, Issue: 04, July-August 2015 *eISSN NO. 2394-5362*
Impact Factor (IIFS) - 0.776

आधुनिक ग्रंथालयात स्वाट (SWOT) विश्लेषण तंत्राची उपयुक्तता

मदन दत्तराव झाडे
संशोधक विद्यार्थी
डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद

डॉ. सिद्दीकी एराज अजीजा
ग्रंथपाल
डॉ. रफिक झकेरीया कॉलेज
फॉर वूमन, औरंगाबाद.

सार :

*प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्वाट (**SWOT**) या व्यवस्थापकीय तंत्राचा अर्थ स्पष्ट करण्यात आला असून या व्यवस्थापन तंत्राची उपयुक्तता आधुनिक ग्रंथालयांमध्ये कशाप्रकारे आहे याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.*

शोधसंज्ञा : *स्वाट (**SWOT**), व्यवस्थापनाचे तंत्र, Strength, Weakness*, opportunities, Threats.

प्रस्तावना :

आधुनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन करावयाचे असल्यास स्वाट (**SWOT**) हे व्यवस्थापकीय तंत्र अत्यंत उपयोगी आहे. मानवाचे संपूर्ण जिवन व्यवस्थापनाने व्यापून गेलेले आहे. फरक इतकाच असतो की, व्यवस्थापनाची पातळी वेगवेगळ्या स्तरांवर झालेली असते. एखाद्या संस्थेची जडण-घडण तीची वाटचाल प्रकृती अथवा तिच्या विनाशास कारणीभूत ठरणारे घटक यांचे व्यवस्थीत आकलन व्यवस्थापना मुळेच होते ग्रंथालय ही एक सेवाभावी व सामाजिक संस्था आहे. त्यामुळे ग्रंथालयाचे व्यवस्थापन हे सामाजिक उद्दिष्ट्ये डोळ्यासमारे ठेवून करावे लागते. स्वाट हे तंत्र अत्यंत आधुनिक

http://www.ksijmr.com

स्वरुपाचे व सर्वत्र वापरले जाणारे तंत्र आहे. औद्योगिक क्षेत्राच्या कार्यातून विकासीत झालेले हे तंत्र आहे.

औद्योगिक क्षेत्रात ठरविलेले उद्दिष्टे साध्य करुन घेण्यासाठी विविध तंत्र असतात. त्यापैकीच स्वाट या एका तंत्राचा वापर केला जातो. औद्योगिक क्षेत्रातील भक्कम बाजू कमकूवत बाजू, विकासाच्या संधी आणि भविष्यात निर्माण होणारे संभाव्य धोके आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या विविध उपाय योजना यांचा या तंत्रात विचार केला जातो. औद्योगिक क्षेत्रातून विकसित झालेले तंत्र केवळ ग्रंथालयात नाही तर विविध क्षेत्रात या तंत्राचा अवलंब केला जातो. स्वाट **(SWOT)** या तंत्रात भविष्यकाळाचा आणि वर्तमान काळाचाही विचार केला जातो.

स्वाट (SWOT) म्हणजे काय :

S	=	**Strength**	=	भक्कम बाजू, जमेची बाजू
W	=	**Weaknesses**	=	दोष, कमकुवत, उणिवा
O	=	**Opportunities**	=	विकासाच्या संधी
T	=	**Threats**	=	धोके/ अडथळे

व्याख्या :

जमेची बाजू,कमकुवतबाजू, विकासाच्या संधी व अडथळे, धोके या चार घटकांच्या विश्लेषणाला स्वाट (**SWOT**) असे म्हणतात. **(मिश्रा, व्हि.एन. आणि कुलकर्णी,जे.एन.२०१२)**

स्वार विश्लेषण तंत्राचे स्वरुप :

व्यूहात्मक नियोजन यशस्वी व्हावे याकरिता काही तंत्रे निर्माण करण्यात आली वेगवेगळ्या बाबी, त्यांचे प्रकार व महत्व यानुसार चौकटबध्द करुन गणिती पध्दतीने त्यांचा उपयोग करता येईल. अशी तंत्रे विकसीत करण्यात आली. स्वाट या नावाची विश्लेषण पध्दती हा त्यातीलच एक प्रकार आहे.

व्यूहात्मक आखणी करतांना अंतर्गत व बाह्य पर्यावरणातील व्यवसायाची बलस्थाने व कमकुवत बाजू आणि भविष्यातील निर्माण होणाऱ्या संधी व धोके, अडथळे अभ्यासणे, त्यांचे विश्लेषण करणे आवश्यक असते. त्याला स्वाट विश्लेषण असे म्हणतात.

संस्थेची अंतर्गत ताकद अथवा परिषोषात्मक बाबी, संस्थेतील अंगभुत दोष वा कमकूवत बाजू, परिस्थितीचा अंदाज घेता वर-वर धोकात्मक परंतु अंतिमत; फायदेशीर ठरु शकरणाऱ्या व्यावसायीक संधी, संस्थाबाह्य परिस्थितीतील भेडसावणाऱ्या धोक्याच्या बाबी या चार इंग्रजी नावाच्या आद्याक्षरांनी मिळून स्वाट (**SWOT**) ही विश्लेषण पध्दती बनवलेली आहे.

आधुनिक ग्रंथालयात स्वाट (SWOT) विश्लेषण तंत्राचा उपयोग :

स्वाट या वश्लिेषण तंत्राचा अत्यंत महत्वाचा उपयोग म्हणजे व्यवस्थापकाला स्वत:ची अशी योग्य ओळख होते. आणि कोणत्याही कारणाने व्यवस्थापन करत असतांना यश अथवा अपयश आले तरी निट संगती लावता येते. व त्यावर अत्यंत सुलभ ती उपाय योजना करणे शक्य होते.

आधुनिक ग्रंथालयांच्या व्यवस्थापनात स्वाट (SWOT) तंत्राची उपयुक्तता :

अ) जमेची बाजू/ बलस्थाने (Strength)

ग्रंथालयात ही एक सामाजिक संस्था आहे. त्यामुळे एखाद्या व्यवसायाप्रमाणे ग्रंथालयाचीही स्वत:ची अशी काही अंतर्भूत ताकद, बलस्थाने असतात. उदा. आधुनिक माहिती सेवा, अनुभवी ग्रंथपाल, कार्यक्षम प्रशिक्षित कर्मचारी वर्ग,अद्ययावत माहिती साधने व यंत्रसामग्री, दर्जेदार सेवा, कार्यक्षम सेवा, वितरण व्यवस्था इत्यादी स्वरुपाती घटक हे ग्रंथालयाची अंतर्भुत ताकद आहेत.

ब) कमकुवत बाजु/ दुर्बलस्थान (Weaknesses) :

प्रत्येक ग्रंथालयांमध्ये काही कमकुवत बाजू असतात. तेव्हा अशा कोणत्या बाजू आहेत याचा शोध घेता येईल. कमकुवत बाजूमध्ये जुने तंत्र, जुनी कार्यपध्दती, जुनी पडकी यंत्रसामग्री, अशिक्षित कर्मचारीवर्ग, अपूरे अनुदान, अपूरी जागा, अपूरे फर्निचर माहिती तंत्रज्ञानाचा अभाव इत्यादी प्रकारच्या कमकुवत बाजू उणिवा असतात. या उणिवा लक्षात घेऊन ग्रंथालयीन कामकाजाचे नियोजन करावे लागते. व्यवस्थापक या नात्याने ग्रंथालयाने या सर्व उणिवा दूर कशा प्रकारे करता येतील हे पाहिजे पाहिजे. ग्रंथालयातील तात्पुरत्या उणिवा आणि कायम असलेल्या उणिवा याची यादी केली पाहिजे तात्पुरत्या उणिवा दूर करण्यासाठी ताबडतोब त्यावर उपाय शोधला पाहिजे. तर ज्या कायमस्वरुपी उणिवा आहेत. त्या दूर करण्यासाठी काही उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत.

http://www.ksijmr.com

क) उपलब्ध संधी (Opportunity) :

ग्रंथालय ही एक वीर्धष्णू संस्था आहे. या डॉ.रंगनाथन यांच्या पंचसूत्रीतील पाचव्या सुत्रानुसार ग्रंथालय आणि ग्रंथालयातील सर्व घटकांमध्ये वाढ, विकास हा सातत्याने होत असतो. म्हणूनच ग्रंथालये ही हळूहळू जतनेसाठी लोकशक्षणाची निरंतर विद्यापीठे बनत आहेत. ग्रंथालयात सेवांचे आदान- प्रदान करतांना लाभदायक ठरणाऱ्या अनुकूल घटकांना संधी असे म्हणतात. अशा अनुकूल घटकांचा शोध घेऊन त्या संधीचा अभ्यास व विश्लेषण करण्यात येते. उदा. वाढती साक्षर लोकसंख्या हा वाचक मिळून देणारा घटक आहे. म्हणून ती ग्रंथालयाच्या वाढीसाठी उपलब्ध संधी आहे.

याकरिता ग्रंथालयाचे ठिकाण वाचकांना सोयीस्कर होईल असे असावे. या सर्व गोष्टीकरिता ग्रंथालयाच्या परिसरात अनुकूल पर्यावरण, अनुकूल आर्थिक धोरण, सामाजिक वातावरण ग्रंथालय वाढीसाठी कायदे इत्यादी संधी व्यवस्थापक म्हणून ग्रंथपालास उपलब्ध करुण देता येईल. त्या दृष्टीने ग्रंथपालाने व मातृसंस्थेने नियोजन व व्यूहरचना केल्यास ते ग्रंथालय उत्तम होऊन वाचकांना उत्कृष्ट सेवा देण्यास सज्ज होऊ शकेल.

ड) संभाव्य धोके / अडथळे (Threats)

ग्रंथालयास दैनंदिन व आकस्मित स्वरुपाचे काही धोकेही निर्माण होऊ शकतात. ग्रंथालयाला अनेक बाबतीत समस्यांना तोंड द्यावे लागते. उदा. आकस्मित संकट, नवीन तंत्रज्ञान अभ्यासक्रम, ग्रंथ चोरीला जाणे, वाळवी किड लागणे, ग्रंथालय संगणकीकरणाबाबत अनास्था, ग्रंथालय सुरक्षा आग, पाणी इत्यादी सर्व बाबींचा विचार करावा लागतो.भविष्यात येणाऱ्या या आकस्मिक स्वरुपाचे धोके

टाळण्यासाठी अगोदरच अंदाज बाजून उपाय योजना करावी लागते. **(खोत, नीमता आणि जाधव, एस.एस. २०१०)**

सारांश :

आधुनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापनामध्ये स्वाट तंत्राची भूमिका किती महत्वाची आहे हे लक्षात येते. व स्वाट तंत्र म्हणजे काय व आधुनिक ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये त्याची उपयुक्तता कीती आहे व त्याचे महत्व काय आहे. हे आपल्याला प्रकर्षाने लक्षात येते. स्वाट हे विश्लेषण तंत्र ग्रंथालयाच्या बाबतीत मर्यादित ठरते. ग्रंथालय ही एक सामजिक आणि सेवाभावी संस्था आहे. त्यामुळे स्वाट हे विश्लेषण तंत्र ग्रंथालय या संस्थेस तंतोतंत लागू पडत नाही. ग्रंथालयातील व्यवस्थापनात असलेल्या अंतर्गत, उणिवा, कमकूवत बाजू आणि संभाव्य धोके या बाबी ग्रंथपालास माहिती असतात. परंतु त्यावर योग्य तो उपाय काढण्यासाठी काही अडचणी येतात व काही प्रमाणात मर्यादाही आहेत किंवा असतात. परंतु तरीही ग्रंथपालास व्यवस्थापन करत असतांना पूर्वनियोजन करण्यासाठी या तंत्राचा उपायोग करता येतो.

संदर्भ ग्रंथ सूची :

- मिश्रा, व्हि.एन. आणि कुलकर्णी,जे.एन.(२०१२), ग्रंथालय व्यवस्थापनाची आधुनिक तंत्रे, लातुर : अरुणा प्रकाशन, पृ.क्र.१०२-११४.
- खोत, नीमता आणि जाधव, एस.एस. (२०१०), ग्रंथालय व्यवस्थापना ऐदू विश्लेषण पध्दतीची उपयुक्तता, ज्ञानगंगोत्री : नाशिक.
- फडके, द.ना. (२०१२) : ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.
- बुवा, जी.एस. (२००७) : ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह, बांद्रा : साई प्रकाशन.
- निकोसे,एस. (२००७) : आधुनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन नागपूर : प्रज्ञा प्रकाशन.